दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १८८ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार, दि.१३ मे २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या मागणीनंतर प्रत्येकी पाच लाख रुपये मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मंजूर


## वैनगंगेत प्राण गमावणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांसाठी सरसावले आ.मुनगंटीवार



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली मान्यता

### आ.मुनगंटीवार यांनी मानले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार

**चंद्रपूर (प्रतिनिधी): गडचिरोली जिल्ह्यातील वैनगंगा नदीत बुडून मृत्युमुखी पडलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पत्राद्वारे करण्यात आलेल्या मागणीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ काही तासांतच या मदतीला मंजुरी दिली. याबद्दल आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार मानले आहेत.**



गडचिरोली येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शिकणारे तिन विद्यार्थी गोपाल गणेश साखरे (बुलढाणा), पार्थ बाळासाहेब जाधव (अहिल्यानगर, शिर्डी) आणि स्वप्निल उद्धवसिंह शिरे (छत्रपती संभाजीनगर) हे तिघे विद्यार्थी १० मे रोजी वैनगंगा नदीत पोहण्यासाठी गेले असता, दुर्दैवाने त्यांचा मृत्यू झाला. वैद्यकीय शिक्षणाच्या प्रारंभीच त्यांच्यावर काळाने घाला घातला. या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

या पार्श्वभूमीवर आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत मदतीची मागणी केली होती. या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत मुख्यमंत्र्यांनी काही तासातच प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली आहे.या दुर्घटनेमुळे राज्यभरातून हळहळ व्यक्त होत आहे. समाजसेवेचे स्वप्न बाळगून वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश केलेल्या या तरुणांचे आयुष्य अचानक संपुष्टात आले. त्यांच्या कुटुंबांना शासनाकडून दिलासा मिळावा, हीच भावना माझी होती. यासाठी केलेल्या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्वरित मान्यता दिली, याबद्दल मी त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे, अशी भावना आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.




---

### रामबाग मैदान हे खेळाडूंच्या हक्काचं मैदान

# जि.प.इमारतीसाठी इतर जागेचा पर्याय शोधावा-विजय वडेट्टीवार

## विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्याकडून रामबाग मैदानाची पाहणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर शहरातील खेळाडूंचा अभिमान असलेल्या रामबाग मैदानावर जिल्हा परिषदेची इमारत उभारण्यासाठी अलीकडेच खोदकाम सुरू करण्यात आले होते. मात्र या कृतीला स्थानिक नागरिक आणि क्रीडापटूंनी तीव्र विरोध दर्शवला. हे मैदान कायमस्वरूपी खेळाडूंकरिता राखीव ठेवावे, हीच जनभावना असून आम्ही यासाठी पूर्ण पाठिंबा देत आहोत, असं विधिमंडळ काँग्रेस पक्षनेते आणि लोकलेखा समिती अध्यक्ष आमदार विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट केलं. त्यांनी काल (दि. ११ मे) रामबाग मैदानाची पाहणी केली.

रामबाग मैदानाचा वापर गेल्या अनेक वर्षांपासून विविध खेळ, व्यायाम व सरावासाठी होत आहे. मात्र काही दिवसांपूर्वी जिल्हा परिषदेची इमारत बांधण्यासाठी या मैदानावर खोदकाम करण्यात आले. मैदानाच्या मध्यभागी खोलवर खोदकाम



झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली. ही बाब समजताच आमदार विजय वडेट्टीवार यांनी तत्काळ आपल्या कार्यकर्त्यांसह मैदानाची पाहणी केली आणि थेट जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद साधला.यावेळी त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, रामबाग मैदान हे खेळाडूंचं हक्काचं मैदान आहे. तिथे कोणतीही प्रशासकीय इमारत उभारू नये. जिल्हा परिषदेच्या इमारतीसाठी इतरत्र जागा शोधावी आणि जनभावनेचा आदर राखावा.

या संवादानंतर जिल्हाधिकारी यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत, ही जागा खेळाडूंकरिता राखीव राहावी यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्याचं आश्वासन दिलं.पाहणी दरम्यान विजय वडेट्टीवार म्हणाले,खेळाडूंच्या हक्काच्या मैदानावर कोणतीही इमारत उभारण्यास आम्ही ठामपणे विरोध करतो. ही जनतेची आणि खेळाडूंची रास्त मागणी असून, आम्ही त्यांच्या संघर्षात पूर्णपणे सहभागी आहोत. हे मैदान कायम क्रीडांगण म्हणूनच जपले जाईल.यावेळी स्थानिक नागरिक, खेळाडू, काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांनी आमदार वडेट्टीवार यांचे आभार मानत त्यांच्या हस्तक्षेपामुळे मैदान वाचवले जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.


---

# क्रिकेटप्रेमींना मोठा धक्का : विराट कोहलीची कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती

**मुंबई । विराम पवार**

भारतीय क्रिकेटमध्ये मोठ्या बदलांची मालिका सुरु असतानाच, आणखी एका दिग्गजाने कसोटी क्रिकेटला अलविदा केले आहे. भारतीय संघाचा माजी कर्णधार आणि चाहत्यांचा लाडका विराट कोहली याने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली असून, ही बातमी क्रिकेटविश्वासाठी मोठा धक्का ठरत आहे.

विराट कोहलीने आपल्या सोशल मिडिया पोस्टद्वारे ही माहिती जाहीर केली. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी रोहित शर्मानेही कसोटी क्रिकेटपासून निवृत्ती घेतल्याची घोषणा केली होती. आता कोहलीच्या निर्णयामुळे भारतीय संघातील दोन मुख्य आधारस्तंभांनी सलगपणे कसोटी क्रिकेटचा निरोप घेतल्याने चाहत्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.



**एक नजर विराट कोहलीच्या कारकिर्दीवर**

* कसोटी (१२३ सामने): ९२३० धावा, ३० शतकं, ३१ अर्धशतकं
* वनडे (३०२ सामने): १४१८१ धावा, ५१ शतकं, ७४ अर्धशतकं, ५ बळी
* टि २० (१२५ सामने): ४१८८ धावा, १ शतक, ३८ अर्धशतकं, ४ बळी
* एकूण आंतरराष्ट्रीय शतकं: ८२

कोहलीने २०० टेस्ट डेब्यूनंतर तब्बल १४ वर्षे कसोटी क्रिकेटमध्ये भारतीय संघासाठी योगदान दिलं. या कालावधीत त्याने १२३ कसोटी सामने खेळले असून, २१० डावांमध्ये ४६.८५ च्या सरासरीने ९२३० धावा फटकावल्या. कसोटीत ३० शतकं आणि ३१ अर्धशतकं झळकावणारा कोहली केवळ ७७० धावांनी १० हजार धावांचा टप्पा गाठण्यापासून दूर राहिला.

आपल्या पोस्टमध्ये विराटने लिहिलं की, बॅगी ब्लू परिधान करून आज १४ वर्ष पूर्ण झाली. कसोटी क्रिकेटने मला घडवलं, अनेक धडे दिले. या फॉरमॅटमध्ये खेळणं म्हणजे एक चिरस्थायी अनुभव आहे. मी कसोटी क्रिकेटला माझं सर्वस्व दिलं आणि याच्या बदल्यात मला जे मिळालं, त्याची सर काहीच नाही. आज मी कृतज्ञ मनाने हा निर्णय घेत आहे.त्याने पुढे म्हटलं की, भारतासाठी कसोटी क्रिकेट खेळणं ही नेहमीच एक सन्मानाची बाब होती. मी माझ्या सहकाऱ्यांचे, प्रशिक्षकांचे आणि चाहत्यांचे ऋणी आहे.

विराट कोहलीचा कसोटी क्रिकेटमधून निरोप म्हणजे एका यशस्वी पर्वाची सांगता आहे. आता कोहली वनडे आणि टी२० फॉरमॅटमध्ये काय भूमिका बजावतो याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

---

### महामार्गावर भीषण अपघात

# कंटेनरची प्रवासी वाहनाला धडक एक ठार, सहा जण जखमी

**पालघर । प्रतिनिधी**

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर मेंढवण गावाच्या हद्दीत सोमवारी सकाळी भीषण अपघात झाला. गुजरात बाजूने भरधाव येणाऱ्या कंटेनरचा चालकाचा ताबा सुटल्याने कंटेनरने रस्त्याचा मधला सुरक्षा कठडा ओलांडत समोरून येणाऱ्या प्रवासी वाहनाला जोरदार धडक दिली. या अपघातात चालकाचा जागीच मृत्यू झाला असून सहा जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी चार लहान मुले आहेत.

अपघातग्रस्त प्रवासी भिवंडी येथील भैरी कुटुंबीय असून, हे सर्वजण मुंबईकडे येत होते. दरम्यान, गुजरातकडून मुंबईकडे येणाऱ्या कंटेनरचा चालक नियंत्रण गमावून बसला आणि कंटेनरने सुरक्षा कठडा ओलांडत समोरून येणाऱ्या त्यांच्या वाहनाला धडक दिली. या धडकेत प्रवासी वाहनाचा ३५ वर्षीय चालक जागीच ठार झाला. मृत चालकाची ओळख अद्याप पटलेली नाही.या अपघातात श्रीनिवास भैरी (४०) आणि स्पंदना भैरी (१७) हे गंभीर जखमी झाले आहेत. तसेच भविका भैरी (४), विहान केथम (११), जशीत भैरी (११) आणि गौतमी भैरी (३७) हे अन्य चार जण किरकोळ जखमी झाले.अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीस धाव घेतली. महामार्ग पोलीस व कासा पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. जखमींना प्रथम कासा उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले, तेथून पुढील उपचारासाठी त्यांना सेलवास येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

दरम्यान, महामार्ग पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली असून, कासा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती प्रभारी पोलीस निरीक्षक अविनाश मांदळे यांनी दिली.

---

### पाकिस्तानकडून हल्ला झाला तर चोख प्रत्युत्तर देऊ

# कारवाई केवळ स्थगित,न्यूक्लियर ब्लॅकमेलिंग सहन करणार नाही

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**-पाकिस्तानसोबत युद्धबंदी झाल्यानंतर ५१ तासांनी, पंतप्रधान मोदींनी सोमवारी रात्री ८ वाजता देशाला संबोधित केले. आपल्या २२ मिनिटांच्या भाषणात पंतप्रधानांनी पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूर, युद्धबंदी, दहशतवाद, सिंधू पाणी करार आणि पीओके यावर भाष्य केले.

पंतप्रधान म्हणाले की, ज्या दहशतवाद्यांनी आपल्या माता-भगिनींचे सिंदूर पुसले होते, त्यांचा आम्ही नाश केला आहे. आमच्या कारवाईत १०० हून अधिक भयानक दहशतवादी मारले गेले आहेत.पंतप्रधान म्हणाले की, पाकिस्तानच्या विनंतीवरून भारताने संघर्ष थांबवण्यास सहमती दर्शविली आहे. भारताने पाकिस्तानविरुद्धची लष्करी कारवाई फक्त पुढे ढकलली आहे. पाकिस्तानचा दृष्टिकोन पाहून आम्ही पुढील कारवाईचा निर्णय घेऊ.



२२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी दाखवलेल्या क्रूरतेने देश आणि जगाला धक्का बसला होता. सुट्टी साजरी करणाऱ्या निष्पाप लोकांची कुटुंब आणि मुलांसमोर क्रूर हत्या हा दहशतीचा एक अतिशय भयानक चेहरा आहे. देशाची सुसंवाद तोडण्याचा हा एक घृणास्पद प्रयत्न होता. माझ्यासाठी वैयक्तिकरित्या, हे दु:ख प्रचंड होते. या दहशतवादी हल्ल्यानंतर, संपूर्ण राष्ट्र, प्रत्येक नागरिक, प्रत्येक समाज, प्रत्येक वर्ग, प्रत्येक राजकीय पक्ष दहशतवादाविरुद्ध कठोर कारवाई करण्यासाठी एका सुरात उभा राहिला.

आम्ही भारतीय सैन्याला दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य दिले. आज, प्रत्येक दहशतवादी संघटनेला माहित आहे की आपल्या बहिणी आणि मुलींच्या कपाळावरील सिंदूर काढण्याचे काय परिणाम होतात. ऑपरेशन सिंदूर हे फक्त एक नाव नाही तर ते देशातील कोट्यवधी लोकांच्या भावनांचे प्रतिबिंब आहे. ऑपरेशन सिंदूर ही न्यायाची अखंड प्रतिज्ञा आहे. ६ मे रोजी रात्री उशिरा आणि ७ मे रोजी पहाटे, संपूर्ण जगाने हे आश्वासन परिणामात रूपांतरित होताना पाहिले.भारतीय सैन्याने पाकिस्तानमधील दहशतवादी छावण्या आणि प्रशिक्षण केंद्रांवर अचूक हल्ले केले. भारत इतका मोठा निर्णय घेऊ शकेल, याची दहशतवाद्यांनी स्वप्नातही कल्पना केली नव्हती. पण जेव्हा देश एकजूट असतो, राष्ट्र प्रथम या भावनेने भरलेला असतो, राष्ट्र सर्वोच्च असते, तेव्हा कठोर निर्णय घेतले जातात. निकाल प्रदर्शित केले जातात. जेव्हा भारताच्या क्षेपणास्त्रांनी आणि ड्रोनने पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर हल्ला केला तेव्हा दहशतवादी संघटनांच्या इमारतीच हादरल्या नाहीत तर त्यांचे मनोबलही डळमळीत झाले.

## कर्तव्य म्हणून नव्हे, माणूस म्हणून वागलो

# प्रमोद चौगुले यांचा निरोप समारंभ मनाच्या कोपऱ्यात घर करून गेला

**मूल । प्रतिनिधी**

कर्तव्य, कणखरपणा आणि कळकळ यांच्या त्रिवेणी संगमाचे उदाहरण ठरलेले पोलीस उपअधीक्षक प्रमोद चौगुले यांनी मूल पोलीस ठाण्यातील आपला तीन महिन्यांचा कार्यकाल नुकताच पूर्ण केला. शनिवार, ११ मे रोजी त्यांचा शेवटचा कार्यदिवस असल्याने पोलीस पाटील संघटना मूल यांच्या वतीने पंचायत समिती सभागृहात आयोजित निरोप समारंभ हा केवळ एक औपचारिक कार्यक्रम नव्हता, तर एका संवेदनशील अधिकाऱ्याच्या माणुसकीला सलाम करण्याची एक हृदयस्पर्शी संधी ठरली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष शशिकांत गणवीर होते, तर प्रमोद चौगुले यांचा सत्कार करण्यासाठी उपाध्यक्ष अमोल वाकुडकर, सचिव संतोष शुद्धलवार, माजी अध्यक्ष गोपाल ठिकरे, पुंडलिक जवादे, संगीता चलावार, नंदाताई शेंडे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. शेकडो पोलीस पाटील या क्षणाचा साक्षीदार व्हायला विशेषतः उपस्थित राहिले. संघटनेतर्फे चौगुले यांचा शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या नावाचा एक गजर सभागृहात गूंजत राहिला.सत्काराला उत्तर देताना चौगुले म्हणाले कर्तव्य निभावताना माणुसकी गमावली गेली, तर ती सेवा अपूर्ण ठरते. मूल ठाणे हे माझ्या पोलीस सेवाजिवनातील पहिले ठाणे असून, येथे मला केवळ सहकार्य नाही तर आपुलकी लाभली. जुनगाव येथील पोलीस पाटलाच्या अपघाती निधनानंतर संघटनेने दाखवलेली तत्परता व माणूसपण माझ्या कायम स्मरणात राहील.पोलीस आणि पोलीस पाटील यांच्यातील संबंध केवळ शासकीय यंत्रणेपुरते मर्यादित न राहता, ते गाव आणि माणसांच्या भल्यासाठी कसे उपयोगी पडू शकतात, हे मूलमध्ये अनुभवलं.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बाळू वाटगरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विजयकुमार दुर्गे यांनी केले. कार्यक्रमात उपस्थित पोलीस पाटलांनीही चौगुले यांना आपल्या आठवणी सांगून शुभेच्छांचा वर्षाव केला.

हा कार्यक्रम केवळ एका अधिकाऱ्याचा निरोप नव्हता, तर पोलीस यंत्रणेत अजूनही संवेदना, आपुलकी आणि नात्यांची गुंफण शिल्लक आहे याचे प्रत्ययकारी उदाहरण होता.



## रोहा येथे शासकीय दाखले व योजनांसाठी मोफत शिबिर

**रोहा । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील रोहा येथील ज्येष्ठ नागरिक सभागृह येथे १४ मे २०२५ रोजी सकाळी ९:३० ते सायंकाळी ५:०० या वेळेत शासन आपल्या दारी या मोफत शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर रोहा तहसील कार्यालय, अष्टमी नगर परिषद आणि सुराज्य सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये नागरिकांना शासकीय दाखले, प्रमाणपत्रे, तसेच विविध योजनांची माहिती दिली जाईल. विशेष म्हणजे, शिबिरात दाखल्यांची फी सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानकडून मोफत दिली जाईल. शिबिरामध्ये एकाच ठिकाणी सर्व शासकीय अधिकारी उपलब्ध असणार आहेत, ज्यामुळे नागरिकांना विविध सेवांचा थेट लाभ मिळेल.सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक रोशन चाफेकर, अध्यक्ष किरण कानडे, सचिव हाजी कोठारी, वैभव कुलकर्णी, कुणाल आंबले, श्रीमती वर्णिका विनीत वाकडे यांचं आवाहन आहे की, सर्व नागरिकांनी आवश्यक कागदपत्रे सोबत आणून शिबिरात सहभागी व्हावे.तरी शिबिराचा अधिकाधिक लाभ घेण्यासाठी नागरिकांनी १४ मे रोजी या शिबिरात उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## रमेश फकिरराव ढगे यांचे दुःखद निधन

**पिशोर । जावेद शेख**




कन्नड तालुक्यातील पिशोर (हिराजीबाबा कमान) येथील रमेश फकिरराव ढगे (वय ४८) यांचे आज, १२ मे २०२५ रोजी, सोमवार दुपारी ३:३० वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचे निधन मोठ्या शोकाकुल वातावरणात झाले.त्यांच्यावर कोळंबी रोडवरील पिशोर येथील स्मशानभूमीत सायंकाळी ६:३० वाजता शोकपूर्ण वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी आणि दोन भाऊ विठ्ठल फकिरराव ढगे आणि रामदास फकिरराव ढगे अशी त्यांची पारिवारिक आठवण राहिली आहे.रमेश फकिरराव ढगे यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबात आणि गावात शोककळा पसरली आहे. त्यांचा आकस्मिक निधन सर्वांसाठी धक्कादायक आहे.

## आज दहावी बोर्डाचा निकाल : अधिकृत संकेतस्थळांवर दुपारी १ वाजता पाहता येणार

**पुणे (वृत्तसंस्था)**–महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने इयत्ता दहावीचा निकाल उद्या १३ मे रोजी दुपारी जाहीर करण्याची घोषणा केली आहे. त्यानुसार, विद्यार्थ्यांना उद्या दुपारी १ वा. बोर्डाने निश्चित केलेल्या अधिकृत संकेतस्थळावर हा निकाल पाहता येईल. बारावी बोर्डाचा निकाल गत आठवड्यातच जाहीर झाला होता हे विशेष.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने गत आठवड्यातच इयत्ता १२ वीचा निकाल जाहीर केला होता. त्यानंतर विद्यार्थी व त्यांच्या पालकांना दहावीचा निकाल केव्हा लागणार? याविषयीची उत्सुकता लागली होती. त्यानुसार, मंडळाने सोमवारी पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या ९ विभागीय मंडळामार्फत




फेब्रुवारी–मार्च महिन्यात घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (१० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपद्धतीनुसार मंगळवारी दुपारी १ वा. ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्याची घोषणा केली. विद्यार्थ्यांना बोर्डाच्या व इतर अधिकृत संकेतस्थळांवर हा निकाल पाहता येईल. त्यानंतर दुसऱ्या दिवसापासून शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष गुणपत्रिकांचे वाटप केले जाईल.

## उल्हासनदीचा श्वास गुदमरतोय, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे प्रदूषणाची लाट

**बदलापूर । प्रतिनिधी**

ठाणे जिल्ह्यातील उल्हास नदी ही केवळ नदी नाही, तर ३५ ते ४० गावांच्या जीवनदायिनी आहे. या नदीच्या पाण्यावर हजारो लोकांचे जीवन अवलंबून आहे, पण सध्या या नदीची स्थिती चिंतेच्या कड्यावर आहे. नदीच्या पात्रात सांडपाणी, रासायनिक नाले, प्लॅस्टिक, घाण, निर्माल्य आणि अन्य कचऱ्याचा प्रचंड ओझा पडलेला आहे. यामुळे नदीच्या पाण्याची चव आणि वास तर बदललेच आहे, परंतु आरोग्याच्या दृष्टीने देखील ती धोक्याची ठरली आहे.



उल्हास नदीवर असलेल्या कारखान्यांच्या विषारी सांडपाण्यामुळे आणि स्थानिकांची बेफाम वावरणे यामुळे नदीला धक्का बसत आहे. नदीच्या किनारी असलेली अव्यवस्थित देवरे, न वापरणारी कपडे, आणि निर्माल्य यांसारख्या वस्तू नदीत टाकल्या जातात. यामुळे नदीचे श्वास गुदमरत असून, जलपर्णींने नदीवर ताबा घेतला आहे. या सगळ्या घटकांनी नदीचा पाणी प्रदूषणाचा लेव्हल प्रचंड वाढवला आहे, आणि आता त्याचा परिणाम अधिक तीव्र होणार आहे.

वर्षानुवर्षे उल्हास नदीच्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणत्याही ठोस उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. दरवर्षी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी नदीचे प्रदूषण कमी करण्याचे आश्वासन देतात, पण प्रत्यक्षात त्यावर काहीही कार्यवाही होत नाही. या नदीला आता आपले अस्तित्व टिकवण्यासाठी कठोर उपाययोजना आणि प्रशासनाच्या सक्रिय हस्तक्षेपाची गरज आहे.

उल्हास नदीला प्रदूषणमुक्त करण्यासाठी सरकारी यंत्रणांनी कडक पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी नागरिक आणि पर्यावरण प्रेमींनी केली आहे. यासाठी जनजागृतीचे कार्य सुरू करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, ज्यामुळे नदीच्या संरक्षणासाठी सर्व नागरिक एकत्र येतील आणि प्रशासनाला ठोस पावले उचलण्यास भाग पडेल.

नदीची हकक मिळवणारी प्रत्येक व्यक्ती आणि गावकरी, यांचा आवाज आता घातक बनत आहे. नदी प्रदूषणमुक्त करा, अन्यथा भविष्य अंधारात आहे!या घोषणेसह नागरिक जागरूक झाले आहेत. प्रशासनाला आता त्यांच्या हातात घेतलेल्या आश्वासनांची पूर्तता करून ठोस उपाययोजना राबवाव्यात. उल्हास नदीच्या संरक्षणासाठी एक महत्त्वाची चाचणी सुरू आहे.कायमचा श्वास आणि जीवनदायिनी असलेली उल्हासनदी, आता प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे गळून जात आहे.

## भगवान बुद्धांची शिकवण आणि विचार शांतिमय जीवनाचा मार्ग–पुलकित सिंह

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भगवान बुद्धांच्या शिकवण आणि विचारांचा अभ्यास केला की, शांतिमय आणि समृद्ध जीवन जगता येते, असे प्रतिपादन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांनी बुद्ध पौर्णिमेच्या प्रसंगी येरुर येथील ओमॅट वेस्ट लिमिटेड (श्री सिद्धबली इस्पात लिमिटेड) यांच्या वतीने आयोजित नवनिर्मित बुद्ध विहार लोकार्पण सोहळ्यात केले. त्यांनी सांगितले की, भगवान बुद्धांचा जीवन प्रवास प्रत्येकासाठी प्रेरणादायक आहे आणि त्यांच्या विचारांचा अवलंब करून जीवनात यश मिळवता येते.




प्रसंगी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांच्या अध्यक्षतेखाली विविध मान्यवर उपस्थित होते, त्यामध्ये ओमॅट वेस्ट लिमिटेड चे प्लांट हेड अविनाश डोंगरे, मुख्य कार्यकारी अधिकारी रिषभ मित्तल, येरूर सरपंच प्रियंका मडावी, उपसरपंच सुनीता वडस्कर यांचा समावेश होता.ओमॅट वेस्ट लिमिटेड ने गावांमध्ये बुद्ध विहारांची निर्मिती केली आहे, ज्यामुळे आज आणि भविष्यातील पिढ्यांसाठी भगवान बुद्धांच्या शांतीच्या संदेशाचा प्रसार होऊ शकतो. पुलकित सिंह यांनी असेही सांगितले की, त्याग आणि शांतीच्या मार्गावर चालून भगवान बुद्धांनी अनेकांचे जीवन बदलले आहे.

ओमॅट वेस्ट लिमिटेड च्या वतीने भविष्यात विविध सामाजिक उपक्रम राबवले जातील, असे मनोगत प्लांट हेड अविनाश डोंगरे यांनी प्रकट केले. येरुरच्या सरपंच प्रियंका मडावी यांनी ओमॅट वेस्ट लिमिटेड च्या योगदानाचे कौतुक करत, भविष्यातही सकारात्मक सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.कार्यक्रमाचे संचालन कपिल शेंडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन रवि चावरे यांनी केले. ओमॅट वेस्ट लिमिटेड च्या महाप्रबंधक रवी चावरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वी झाला.महाप्रबंधक मनीष वडस्कर, महाप्रबंधक अमरेंद्र सिंह ठाकूर, महाप्रबंधक सतीश मूलकलवार, महाप्रबंधक ओमनरेश भदोरिया, मानव संसाधन विभाग प्रमुख अभय सिंह, प्रशासन विभाग प्रमुख दीपक पराळे, बांधकाम विभाग प्रमुख चेतन चोहिवाल, विजय कनोजे, आनंद मिश्रा, कपिल जैन, अभिषेक खुपत, शुभम तंबोली, स्वप्नील देशमुख, खुशाल गावंडे, समीर पाल, अशोक टोंगे यांनी विशेष योगदान दिले.

## अमर सलागरे यांना गगनभरारी समर्थ पुरस्कार प्रदान




**रोहा । प्रतिनिधी**

रोहा तालुका, रायगड येथील अमर सलागरे यांना शैक्षणिक, सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रातील असामान्य कार्यासाठी समर्थ फाउंडेशन आणि वल्लरी मीडिया यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, १० मे २०२५ रोजी पुणे येथे गगनभरारी समर्थ पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

या कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील २१ मान्यवरांना हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच, वल्लरी मीडिया मार्फत या पुरस्कार प्राप्त मान्यवरांची यशोगाथा असलेले गगनभरारी हे पुस्तक मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशित करण्यात आले.कार्यक्रमात राजेश पांडे, विद्याधर ताठे, दीपक मोकाशी हे मान्यवर उपस्थित होते. समर्थ फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. किरण इनामदार आणि वल्लरी मीडियाचे व्यंकटेश कल्याणकर यांचेही उपस्थितीत स्वागत करण्यात आले.अमर सलागरे यांना त्यांच्या गेल्या २५ वर्षांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रातील योगदानासाठी हा सन्मान प्राप्त झाला. त्यांच्या या कार्यामुळे समाजातील सर्व स्तरांतील लोकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## सावनेर तहसील कार्यालयातील महिला बचत गटाच्या ऑनलाईन सेंटरमध्ये मोठ्या प्रमाणात लूटमार, प्रशासनाचे दुर्लक्ष!

**सावनेर । प्रतिनिधी**

सावनेर तालुक्यातील तहसील कार्यालयातील महिला बचत गटाच्या ऑनलाईन व झेरॉक्स सेंटरमध्ये मोठ्या प्रमाणात लूटमार होण्याचे समोर आले आहे. येथे ग्राहकांना झेरॉक्स काढण्यासाठी ४ ते ५ रुपये प्रति कॉपी घेतले जातात, तर ऑनलाईन कामांसाठी २०० ते ३०० रुपये चार्जेस लावले जातात. तिथे सेवा घेण्यासाठी आलेल्या नागरिकांना अभद्र भाषेत बोलले जाते आणि जर कोणी तिथे विचारपूस केली तर त्यांना हाकलून लावले जाते. तसेच, ग्राहकांना बसू नये, गर्दी करू नये अशी सूचना देण्यात येते.

ही लूटमार आणि फसवणूक सुरू असताना, प्रशासनाने यावर कोणतीही ठोस कारवाई केली नाही आहे. या कारभारात कोणत्याही प्रकारच्या पारदर्शकतेचा अभाव असून, सर्व कामकाज लहरी आणि मर्जीनुसार चालत आहेत. अनेक वेळा तक्रारी केल्यानंतरही काही कारवाई झाली नाही.नागरिकांच्या यावर चिंता व्यक्त करत, स्थानिक संस्थांनी ग्राहक संरक्षण संस्थेसह प्रशासनाला लक्ष देण्याची विनंती केली आहे. जर यावर तात्काळ उपाय योजना करण्यात येऊ नयेत, तर गरीब आणि दुर्बल नागरिकांची मोठ्या प्रमाणात




फसवणूक होऊ शकते.

महिला बचत गटाच्या कामकाजात सुधारणा केली जावी आणि यावर त्वरित नियंत्रण ठेवले जावे, अशी मागणी केली जात आहे.

## कळमेश्वर तहसील कार्यालयात कामकाज ठप्प; चकरा मारणाऱ्या नागरिकांचा संताप




**कळमेश्वर । प्रतिनिधी**

कळमेश्वर तहसील कार्यालयातील कामकाज हे दिवसेंदिवस ढिले झाले आहे. इन्कम सर्टिफिकेटसाठी एक महिना, रेशन कार्डसाठी एक ते दोन महिने लागतात. या कार्यालयात काम करणारे सेतू कर्मचारी मात्र कामकाजाच्या बाबतीत गंभीर नसल्याचे दिसून येते. त्यांच्या उडत्या भाषेत बोलण्याचा प्रकार नागरिकांना त्रास देत आहे.

ग्राहकांना कामासाठी बार–बार चकरा माराव्या लागतात, परिणामी त्यांचे वेळ आणि पैसे दोन्ही वाया जात आहेत. काही कामे बाहेरून केली जातात, तरीही काम पूर्ण होण्यास महिन्यांमहिन्यांचा कालावधी लागतो. इन्कम सर्टिफिकेट किंवा शाळेतील कलर्शीपसाठी आवश्यक असलेले कागदपत्रे वेळेवर मिळत नाहीत.तसेच, कर्मचारी टेबलवर दिसत नाहीत आणि एकाच कारणामुळे त्यांना कायम मीटिंग आहे असे सांगितले जाते. नागरिकांची स्थिती असह्य झाली आहे आणि त्यांच्या कामात झालेल्या विलंबामुळे प्रशासनावर नाराजी वाढत आहे.तहसील कार्यालयात लवकरच सुधारणा केली जावी आणि कामकाजाची गती वाढवली जावी. नागरिकांचा वेळ आणि पैसे वाचवण्यासाठी कारभारात पारदर्शकता आणि कार्यक्षमता आणणे अत्यंत आवश्यक आहे.

# विद्यार्थ्यांमध्ये ग्रामगीतेचे संस्कार रुजविणे आवश्यक-आ.राजेश बकाने

**देवळी । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून त्यांच्यात सुसंस्कार आणि सामाजिक जाणिवा निर्माण करणे ही आजच्या काळाची नितांत आवश्यकता आहे. सुजाण नागरिक घडविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज आहे, असे मत आमदार राजेश बकाने यांनी व्यक्त केले. देवळी येथे आयोजित स्व. रमेशराव पठाडे गुरुजी स्मृती आंतरशालेय ग्रामगीता पाठांतर स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.कार्यक्रमाचे उद्घाटन माला इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. मंगेश घोगरे, गटशिक्षणाधिकारी राजेश रेवतकर, विदर्भ मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सतीश जगताप, सामाजिक कार्यकर्ते राहुल चोपडा, माजी केंद्रप्रमुख वसंत खोडे, माजी मुख्याध्यापक मीना पठाडे, माजी प्राचार्य अनिल टोपले, मनीष जगताप, शिवाजी चौधरी, डॉ. राजश्री देशमुख, युवा कीर्तनकार विष्णू ब्राह्मणवाडे, प्रा. अभिजित पाटील, मुख्याध्यापक पुंडलिक नागतोडे, शंकर भोयर, तुषार पठाडे व प्रांजली पठाडे यांची उपस्थिती होती.

ग्राम जयंती उत्सवाचे औचित्य साधून आयोजित या स्पर्धेचे आयोजन पंचायत समितीच्या सभागृहात करण्यात आले होते. या उपक्रमाचे हे चौथे वर्ष असून यंदा १६ शाळांतील ८१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिखित ग्रामगीतेतील वर्णव्यवस्था, गरीबी श्रीमंती, दलित सेवा, प्रयत्नप्रभाव व जीवनकला या पाच अध्यायांपैकी निवडलेल्या अध्यायातील ओव्यांचे



प्रभावी सादरीकरण केले.

स्पर्धेत इयत्ता पाचवी ते आठवी गटात प्रथम क्रमांक हिमानी हिवंज, द्वितीय अर्णव यादव, तृतीय आरुषी आगे यांनी पटकावले. चतुर्थ क्रमांक अथर्व अखुज, पाचवा स्पर्श लोखंडे, सहावा मयुरी जाधव व सातवा क्रमांक साहिल भगत यांना प्राप्त झाला. नववी ते बारावी गटात अनुश्री वाघमारे हिने प्रथम, अमृता मेश्राम हिने द्वितीय, सौम्या पहाडे हिने तृतीय क्रमांक पटकावला. याशिवाय रेणुका ढिघडे, वैष्णवी मरस्कोल्हे, अनुराधा देवघरे व अर्णव झिलपे यांनी अनुक्रमे चौथा ते सातवा क्रमांक मिळवला.

विजेत्या स्पर्धकांना गौरवचिन्ह, प्रमाणपत्र व शैक्षणिक साहित्य देऊन गौरविण्यात आले. सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे सादरीकरण कौतुकास्पद होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गुरुदेव सेवा मंडळ, कोल्हापूर (सिंगारवाडी) येथील युवा भजन मंडळीने खंजरीच्या गजरात राष्ट्रसंतांचे भजन सादर केले. त्यानंतर स्व. रमेशराव पठाडे गुरुजींना आदरांजली अर्पण करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवाजी चौधरी यांनी केले. संचालन विद्या नरड हिने केले तर आयोजन समितीचे चेतन परळीकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# नात्याला काळिमा; सुनेची वयोवृद्ध सासूला बेदम मारहाण

## मारहाणीत सासूचा हात फॅक्चर ;तिघा विरोधात सिंदी पोलिसात गुन्हा दाखल

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

घर खाली करण्यासाठी बहीण व भाऊजीच्या मदतीने सुनेने वृद्ध सासूला बेदम मारहाण करून नात्याला काळिमा फासणारी घटना येथील वार्ड क्रमांक १२ मध्ये शनिवारी दिनांक १० मे रोजी घडली. बेबी घनश्याम मुन वय ६७ वर्ष असे वृद्ध महिलेचे नाव असून या मारहाणीत वृद्ध महिलेचा हात मोडला आहे. याबाबत बेबी मुन यांनी सिंदी पोलिसात तक्रार दाखल केली असून आरोपी सुजाता अमोल मुन, उज्वला राजू मेंढे व राजू मेंढे यांच्याविरुद्ध सिंदी पोलिसात विविध कलमा नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार येथील वार्ड क्रमांक १२ मधील वृद्ध महिला बेबी घनश्याम मुन वय ६७ वर्ष ही आपल्या पतीसोबत राहत असून मुलगा व सून यांचे सासू व सासरे यांच्यासोबत पटत नसल्याने त्याच वार्डात इतरत्र किरायाने राहतात. परंतु, सुनेला मकानाचा किराया झेपत नसल्याने मागील काही महिन्यांपासून सून सुजाता अमोल मुन हिने सासू-सासरचे घर खाली



करून आम्हाला द्या व तुम्ही येथून निघून जा, असा तगादा लावला. त्यामुळे शनिवारी दिनांक १० मे २०२५ रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास आरोपी सून सुजाता अमोल मुन बहीण उज्वला राजू मेंढे व राजू मेंढे यांनी अचानक वृद्ध महिलेच्या घरी प्रवेश केला. 'तुले दहा वेळा सांगितले की, तू घर खाली कर' पण, तू घर खाली करत नाही. आम्हाला लोकांच्या घरी किरायाने राहावे लागत आहे. असे म्हणत सून सुजाता मुन वृद्ध सासूला अश्लील, अभद्र शिवीगाळ करू लागली. सून एवढ्यावरच थांबली नाही तर सोबत घेऊन आलेल्या बहीण व भाऊजीच्या मदतीने वृद्ध महिलेला जमिनीवर खाली पाडून तिन्ही आरोपींनी बेदम मारहाण केली. वृद्ध महिलेने आरडाओरडा करताच शेजारी राहणाऱ्या चंद्रकला अशोक भगत, छाया युवराज थुल, रेखा रामराव फुलकुंडे यांनी काही वेळानंतर आरोपींच्या तावडीतून कशीबशी बेबी मुन हिची सुटका केली. दरम्यान, वार्डातील लोकं जमा झाल्यामुळे आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला.या मारहाणीत वृद्ध महिलेचा डावा हात दोन ठिकाणी फॅक्चर असून महिलेच्या शरीरावर गंभीर जखमा आहे. बेबी मुन यांनी या घटनेची तक्रार ११ मे २०२५ रोजी सिंदी पोलिसात केली आहे. बेबी मुन यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी सुजाता अमोल मुन वय, उज्वला राजू मेंढे व राजू मेंढे यांच्याविरुद्ध कलम ११७(२), ३३२(ल), २९६, ३५१(२), ३५१(३), ३५२, ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सिंदी पोलीस करीत आहे.

# बच्चू कडू यांच्या हस्ते संताजी धनाजी पुरस्काराने सचिन वैद्य सन्मानित

## प्रहार शेतकऱ्यांच्या हितासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या घरासमोर करणार आंदोलन

**देवळी । प्रतिनिधी**

संताजी धनाजी पुरस्कार वितरण सोहळा व विभागीय मेळावा संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन अमरावती येथे पार पडला त्यावेळी माजी राज्यमंत्री आमदार बच्चू कडू यांनी राज्य सरकारवर आपल्या भाषणात ताशेरे ओढले.

यावेळी विचार पिठावर दिनेश बुब , संताजी धनाजी पुरस्कार अभियानाचे प्रमुख महेश बडे , पुरस्काराचे निरीक्षक नितीन आगे , प्रहारचे कार्याध्यक्ष बल्लू जंवजाळ , प्रदेश प्रवक्ता जितू दुधाने , जिल्हाध्यक्ष छोटू महाराज वसु , मंगेश देशमुख , प्रवीण हेंडवे , नंदू कुवठे , चंदू खेडकर , घनश्याम पेठे , नितीन चौधरी , तुषार तुपटकर , विकास दांडगे , सुरज कुकडे , बंटी रामटेके , उमेश मेश्राम , मोईन अली , श्याम राजपूत , संतोष फाईट, प्रमोद कुराळकर, जोगेंद्र मोहोड , निलेश टापरे आदी प्रहारचे कार्यकर्ते विराजमान होते .



बच्चू कडू म्हणाले की तमिळनाडू सरकारचा अर्थसंकल्प तीन लाख कोटीचा आहे कृषी क्षेत्रासाठी ४००० कोटीची तरतूद आहे उत्तर प्रदेश सरकारचा ८.५ लाख कोटीचा अर्थसंकल्प असताना शेतकऱ्यांसाठी ४५ हजार कोटी रुपये ठेवले आहे महाराष्ट्राचा अर्थसंकल्प साडेसात लाख कोटी रुपयांचा आहे पण कृषी क्षेत्रासाठी केवळ ९००० कोटी रुपयांची तरतूद केली जाते कोणी यावर प्रश्न विचारणार आहे कोण या विषयावर पुढाकार घेणार आहे एकही शेतकरीपुत्र बोलायला तयार नाही या लोकांच्या टाळक्यात हाणण्याचे काम प्रहार केल्याशिवाय राहणार नाही , अर्थमंत्री अजित पवार यांचा अडीच लाख रुपये पगार तर दिव्यांग यांना पंधराशे रुपये , मोबाईलचा मिडिया म्हणून वापर करा , तसेच निवडलेले संताजी धनाजी पुरस्कारथी अरुण शेवने , पुष्पक खापरे , मंजुषा बोडके , सचिन वैद्य , सागर जैन , वैभव कुमार निमकर , संदेश राठोड , रंजीत लहाने , राहुल मोहितवार , समीर तायडे , सुरज कुबडे , सुरज गहते , गौरव नाईक , धीरज आडे यामध्ये वर्धा जिल्ह्यातील सचिन वैद्य , पत्नी सुवर्णा , मुलगी जीविका , मुलगा स्वराज यांना परिवारासह प्रथम क्रमांक नेताजी सुभाषचंद्र बोस सोशल मीडिया पुरस्कार देऊन सन्मानपत्र , सन्मानचिन्ह पुष्पगुच्छ देऊन बच्चू कडू यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले त्याप्रसंगी मोठ्या संख्येने अमरावती , वर्धा , यवतमाळ जिल्ह्यातील पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**या कार्यक्रमांमध्ये भीम गीते व बुद्ध गीतांची प्रस्तुती संध्या रोहनकर यवतमाळ, दिव्या शेंडे यवतमाळ व विजय चांदेकर चंद्रपूर यांनी केली.**

# पो.स्टे.सिंदी रेल्वेचे पथक सक्रिय-विदेशी व देशी दारूचा ९३,६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे येथील पथकाने दिनांक १२ मे २०२५ रोजी परसोडी रस्त्यावरील उड्डाण पुलाजवळ विशेष कारवाई करत विदेशी व देशी दारूचा एकूण ९३,६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई खास खबऱ्यांद्वारे मिळालेल्या माहितीनुसार करण्यात आली. पथकाने त्या ठिकाणी नाकेबंदी करून तपासणी केली असता आरोपी शारीक शहा रहमान शहा (वय ३८ वर्ष, रा. लादेन नगर, सिंदी रेल्वे) याच्याकडून एक निळ्या रंगाची टीव्हीएस ज्युपिटर मोपेड (क्र. MH 40/CP/5214) अंदाजे २०,००० रुपये किमतीची, तसेच गाडीच्या पायदानावर ठेवलेले एक खरड्याचे खोके व तीन खोक्यांमध्ये एकूण ९६ बाटल्या दारू जप्त करण्यात आल्या. त्यामध्ये ४८




बाटल्या ऑफिसर्स चॉईस या विदेशी दारूच्या (प्रति नग २००) आणि ४८ बाटल्या लावणी संत्रा या देशी दारूच्या (प्रति नग १६०) होत्या.सदर आरोपीकडून जप्त केलेला एकूण मुद्देमाल ९३,६०० रुपयांचा आहे. या प्रकरणी शारीक शहा रहमान शहा व गौरव दिक्षीत (रा. सिंदी रेल्वे) यांच्याविरोधात गुन्हा क्रमांक १२२/२०२५ नोंद करण्यात आला असून त्यांच्यावर महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(अ), ७७(अ), ८३ आणि मोटार वाहन कायदा कलम १३०, १७७, व ३(१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक अनुराग जैन, अप्पर पोलीस अधीक्षक सागर कवडे आणि प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नरेंद्र निस्वादे यांच्या नेतृत्वात पोलीस हवालदार आनंद भर्म, प्रमोद डफ, कैलास हरणे, पोलीस शिपाई कांचन चाफले, उमेश खामनकर आणि समीर आगे यांनी केली.

# बुद्ध पौर्णिमा निमित्ताने धामणगाव रेल्वेमध्ये निघाली भव्य शांती रॅली

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मून**

अखिल विश्वाला शांती, मैत्री आणि अहिंसेचा संदेश देणारे महाकारुणिक तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त धामणगाव रेल्वे शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळी जिवक बुद्ध विहार येथे बुद्ध पहाट या सांस्कृतिक व आध्यात्मिक कार्यक्रमाने सुरुवात झाली. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरमधील धम्मद्यो बुद्ध विहार येथे भिक्खू भन्ते यांच्या मार्गदर्शनाखाली धम्मप्रवचनाचे आयोजन करण्यात आले.

संपूर्ण धामणगाव रेल्वे तालुक्यातील विविध बुद्ध विहारांमध्ये बुद्ध पौर्णिमा निमित्ताने विविध उपक्रम पार पडले. संध्याकाळी सात वाजता शहरातील प्रत्येक बुद्ध विहारातून निघालेली मेणबत्ती रॅली ही शांततेच्या आणि सामाजिक सलोख्याच्या संदेशाने ओतप्रोत होती. ही



रॅली नगर परिषद प्रांगणातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत पोहोचली. हजारो नागरिकांनी शांततेचे प्रतीक असलेल्या मेणबत्त्या प्रज्वलित करून तथागत बुद्धांच्या विचारांना आणि डॉ. आंबेडकरांच्या कार्याला अभिवादन केले.

# भांडगाव सोसायटीवर राऊत यांची कमान; परकाळे उपाध्यक्ष

**इंदापूर । दत्तात्रय गवळी**

येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी गणपत राऊत यांची, तर व्हाईस चेअरमनपदी संजय परकाळे यांची एकमताने निवड झाली. ही निवड इंदापूर तहसील कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी संध्या कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.गणपत राऊत हे नाभिक समाजातील असून, त्यांनी यापूर्वीही सोसायटीच्या कामकाजात प्रामाणिकपणे सहभाग घेतला आहे. त्यामुळे त्यांच्या निवडीचे स्वागत करण्यात आले. सोसायटीचे एकूण भागभांडवल १२७.२१ लाख रुपये इतके असून १३८३ सभासद असलेल्या या संस्थेने ग्रामीण भागात भक्कम विश्वास संपादन केला आहे.

या निवडीनंतर संचालक सयाजी कोकणे, दत्तात्रय वीर, सुभाष गायकवाड, अंकुश परकाळे, सचिन शिंदे, केशव गायकवाड, अण्णासो कदम, अरुण वीर, निवृत्ती ढुके, शांताबाई गायकवाड, रंजना काळे, तज्ञ संचालक शरद गायकवाड, बबन जाधव, सचिव सोमेश्वर जमदाडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.गणपत राऊत यांच्या निवडीमुळे भांडगावमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.



# परिचारिका म्हणजे रुग्णालयाचा श्वास-आ.किशोर जोरगेवार







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

समाजात डॉक्टरांना देव मानले जाते आणि या देवाच्या सेवेला साथ देणाऱ्या परिचारिका म्हणजे त्यांची खरी शक्ती आहे. परिचारिका हा केवळ एक व्यवसाय नसून ती एक सेवा वृत्तीची मूर्ती आहे. परिचारिका म्हणजे रुग्णालयाचा श्वास आहे. त्यामुळे जागतिक परिचारिका दिन हा दिवस केवळ एक औपचारिकता नसून, त्याग, सेवा, सहवेदना आणि माणुसकीच्या सर्वोच्च मूल्यांचा गौरव करणारा दिवस आहे, असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.कर्मवीर मा.सा. कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा सामान्य रुग्णालय यांच्या वतीने प्रियदर्शिनी सांस्कृतिक सभागृहात जागतिक परिचारिका दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते अध्यक्ष म्हणून बोलत होते. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, डॉ. दीक्षित, प्रा. पुष्पा पोडे, वर्षा टेंभुर्णे, माया आश्राम आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार जोरगेवार म्हणाले की,पेशंटच्या वेदनेत सहभागी होणाऱ्या, रात्रंदिवस अविरत सेवा देणाऱ्या, स्वतःच्या कुटुंबापेक्षा रुग्णांच्या सेवेला प्राधान्य देणाऱ्या परिचारिकांचे कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे. कोरोना महामारीच्या काळात आपण सगळ्यांनी परिचारिकांची खरी ताकद अनुभवली. जोखीम असूनही त्या डगमगल्या नाहीत, त्यांनी रुग्णांसोबत मानवतेचा खरा धर्म निभावला. त्या काळात परिचारिका म्हणजे देवदूतच होत्या.

आजच्या या विशेष दिवशी, एका लोकप्रतिनिधीच्या नात्याने, परिचारिकांच्या सेवा-सुविधा, सन्मान व हक्क यांचा विचार करताना शासनाच्या पातळीवर मी नेहमीच तुमच्या पाठीशी उभा राहीन. आपल्या चंद्रपूर जिल्ह्यातील वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असेही त्यांनी सांगितले.रुग्णांच्या वेदनेने सुरू झालेला परिचारिकांचा दिवस, रुग्णाच्या चेहऱ्यावरच्या समाधानानेच संपायला हवा. काल 'मदर्स डे' साजरा झाला, आज आपण परिचारिका दिन साजरा करत आहोत. परिचारिका ही आईसारखीच शांत, संयमी आणि काळजीवाहू असते. आई आपल्या लेकरासाठी जे करते, तेच एक परिचारिका आपल्या रुग्णासाठी करते. त्यामुळे परिचारिकांचा सन्मान हा समाजाचा महोत्सव असावा, असेही आमदार जोरगेवार म्हणाले. या कार्यक्रमाला परिचारिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# रामबाग मैदानाची आ.किशोर जोरगेवार यांच्याकडून पाहणी

## खोदलेला खड्डा बुजवण्यास सुरुवात; मैदान पूर्ववत करण्याचे काम सुरू

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

रामबाग मैदानावर जिल्हा परिषदेची इमारत उभारण्याच्या प्रस्तावावर काल जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीनंतर आज आमदार किशोर जोरगेवार यांनी प्रत्यक्ष रामबाग मैदानावर जाऊन पाहणी केली. त्यांनी मैदानात खोदलेल्या भागाची तपासणी केली व संबंधित अधिकाऱ्यांना मैदान तातडीने पूर्ववत करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर मैदान पूर्ववत करण्याच्या हालचालींना गती मिळाली आहे.



पाहणीदरम्यान आमदार जोरगेवार म्हणाले, कालच्या बैठकीत प्रशासनाने जनतेच्या भावना लक्षात घेऊन सकारात्मक भूमिका घेतली. रामबाग मैदान अबाधित ठेवण्याचा निर्णय हा जनतेच्या एकजुटीचा आणि लोकशाहीच्या मूल्यांचा विजय आहे. आता इथे झालेली हानी तातडीने दुरुस्त करणे आवश्यक आहे.रामबाग मैदानात खोदलेला खड्डा युद्धपातळीवर बुजवण्याचे काम त्वरित पूर्ण करा. मैदानाची जुनी रचना कायम राखण्यासाठी आवश्यक ती सर्व काळजी घेण्यात यावी, असेही आमदार जोरगेवार यांनी स्पष्ट केले.

आमदार जोरगेवार यांच्या पाहणीमुळे आणि कामाला मिळालेल्या गतीमुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. स्थानिक रहिवासी, खेळाडू आणि ज्येष्ठ नागरिकांनी आमदारांचे आभार मानले. आमचा आवाज ऐकला गेला, हे खूप महत्त्वाचे आहे. आता मैदान पुन्हा आपल्या मुलांसाठी आणि खेळाडूंना उपलब्ध होईल, ही आनंदाची गोष्ट आहे, असे नागरिकांनी सांगितले.

रामबाग मैदान हे चंद्रपूर शहराचे फुफ्फुस आहे. ते अबाधित राहावे, यासाठी सुरू असलेला संघर्ष आता यशाच्या दिशेने जात आहे. आमदार किशोर जोरगेवार यांच्या तात्काळ हस्तक्षेपामुळे व नागरिकांच्या एकजुटीमुळे हे शक्य झाले आहे. मैदानाच्या दुरुस्तीची कामे लवकर पूर्ण होऊन ते पूर्ववत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या पाहणीवेळी दशरथसिंह ठाकूर, मनोज पॉल, सुभाष कासनगोट्टूवार, तुषार सोम, माजी नगरसेवक प्रदीप किरमे यांच्यासह खेळाडू आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपा वर्धा जिल्हा कार्यालयाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न

## नव्या संघटनात्मक पर्वाची भक्कम पायाभरणी

**वर्धा । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या वर्धा जिल्ह्यातील संघटनात्मक वाटचालीस नवे अधिष्ठान देणाऱ्या जिल्हा कार्यालयाच्या भव्य इमारतीचे भूमिपूजन आज मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अत्यंत उत्साहात आणि साक्षीदारांच्या मोठ्या उपस्थितीत पार पडले. या नव्या कार्यालयामुळे पक्षाच्या कार्यामध्ये अधिक सुसूत्रता येणार असून कार्यकर्त्यांना एक सुसज्ज, प्रेरणादायी केंद्र लाभणार आहे.कार्यक्रमाच्या प्रारंभी भूमिपूजन विधी पार पडली, त्यानंतर मान्यवरांचे स्वागत व भाषणे झाली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणात सांगितले की, भाजपासाठी हे फक्त कार्यालय नाही, तर ही विचारधारेची गडकोट उभारण्याची सुरुवात आहे. आमच्या कार्यसंस्कृतीचा केंद्रबिंदू म्हणजे लोकशाही, पारदर्शकता आणि सेवा. हे कार्यालय या मूल्यांची साक्ष देणारे ठरेल.



मुख्यमंत्र्यांनी पुढे सांगितले की, वर्धा जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी '१.५ कोटी सदस्यत्व' मोहिमेत दिलेले योगदान अभूतपूर्व आहे. ही इमारत त्यांच्या मेहनतीला सलाम करणारी असून, भविष्यातील अनेक विजयांची नांदी ठरणार आहे.नवीन जिल्हा कार्यालयातून पक्षाच्या संघटनात्मक व सामाजिक उपक्रमांना अधिक वेग मिळणार आहे. स्थानिक नागरिकांसाठी हे केंद्र संपर्क सुविधा, शासकीय योजना, मार्गदर्शन व जनहिताचे उपक्रम यांचे केंद्रबिंदू ठरेल. पक्षाची धोरणे व विकासकार्य सामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वाचे साधन म्हणून ही वास्तू कार्य करेल.या सोहळ्यात अनेक मान्यवर उपस्थित होते – आदिवासी विकास मंत्री मा. अशोक उईके, जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर, माजी खासदार रामदास तडस, विधान परिषदेचे सदस्य दादाराव केचे, देवळी-पुलगावचे आमदार राजेश बकाने, आर्वीचे आमदार सुमित वानखेडे, हिंगणघाटचे समिर कुणावार,भाजपा जिल्हाध्यक्ष सुनील गफाट आणि इतर पदाधिकारी. हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते आणि नागरिकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदारत्व स्वीकारले.कार्यक्रमाची सांगता भारत माता पूजन आणि वंदे मातरम घोषणांनी झाली. वर्धा जिल्ह्यातील हा प्रसंग भारतीय जनता पक्षाच्या पुढील वाटचालीत एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असल्याची भावना सर्वांनी व्यक्त केली.

# भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाचे मुख्य प्रशिक्षक निलेश मत्ते यांचा स्फूर्ती स्पोर्टिंग क्लब वरोरात सत्कार

**वरोरा । प्रतिनिधी**

स्फूर्ती स्पोर्टिंग क्लब वरोराचे खेळाडू निलेश अरविंद मत्ते यांची भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या मुख्य प्रशिक्षक पदावर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा स्फूर्ती स्पोर्टिंग क्लबच्या वतीने आणि त्यांच्या पत्नी रूपाली मत्ते यांचा सत्कार करण्यात आला. निलेश मत्ते हे स्फूर्ती स्पोर्टिंग क्लब वरोराचे प्रशिक्षक, पदाधिकारी तसेच व्हॉलीबॉल खेळाडू म्हणून प्रसिद्ध आहेत. त्याचसोबत ते नागपूर येथील महालेखाकार कार्यालयात वरिष्ठ लेखाधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या मुख्य प्रशिक्षक पदावर निवड होणे हे वरोरा वासियांसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. त्यांच्या या यशाचा गौरव करताना स्फूर्ती स्पोर्टिंग क्लबचे अध्यक्ष प्राध्यापक डॉ. आर. आर. महाजन यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला. यावेळी स्फूर्ती स्पोर्टिंग क्लबचे सचिव सुनील जवदंड, प्राध्यापक प्रयाग ठाकरे, ज्येष्ठ पदाधिकारी प्रवीण खिरटकर आणि क्लबचे खेळाडू, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.




भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाचे सराव शिबिर सध्या गांधीनगर, गुजरातमध्ये सुरू आहे. निलेश मत्ते यांच्या मार्गदर्शनात भारतीय महिला व्हॉलीबॉल संघ व्ही ए तनाम या देशात आयोजित आंतरराष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेत सहभागी होणार आहे. कार्यक्रमाचे संचालन प्राध्यापक प्रयाग ठाकरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार स्फूर्ती स्पोर्टिंग क्लबचे ज्येष्ठ पदाधिकारी प्रवीण खिरटकर यांनी मानले.

# समाजसेवक प्रमोद नागापूरेंच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त रक्तगट व रक्त तपासणी शिबिराचे आयोजन


**वरोरा । प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्ते प्रमोद नागापूरे आणि त्यांच्या पत्नी यांच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय, वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तगट व विविध रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर गुरुवार, दिनांक १५ मे २०२५ रोजी सकाळी ८ वाजता गुरुदेव सेवा मंडळ सभागृह, परसोडा येथे आयोजित करण्यात येणार आहे. या शिबिरात रक्तगट तपासणीसह उइउ, लिव्हर फंक्शन टेस्ट, किडनी फंक्शन, थायरॉईड तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी, सिकलसेल तपासणी आणि क्ष्झडउ तपासणी अशा अनेक अत्यावश्यक तपासण्या मोफत करण्यात येणार आहेत.



विशेष म्हणजे, शिबिरादरम्यान 'आयुष्मान भारत' योजनेअंतर्गत आरोग्य कार्ड काढून मिळणार आहे. यासाठी आधारकार्ड व रेशन कार्ड सोबत आणणे बंधनकारक आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती निर्माण व्हावी आणि गरजू नागरिकांना वेळेवर तपासणी व उपचार मिळावेत, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. समाजसेवेची निस्वार्थ भावना ठेवून प्रमोद नागापूरेंनी घेतलेला पुढाकार परिसरात कौतुकाचा विषय ठरत आहे.





# वाघाच्या हल्ल्यात महिला ठार; तीन दिवसांत पाच महिलांचा बळी, जिल्ह्यात दहशतीचं वातावरण

### वडेट्टीवार यांनी मागणी केली तात्काळ कारवाईची

लोक लखा समितीचे अध्यक्ष व ब्रह्मपुरीचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी तातडीने घटनास्थळी भेट देत वन व पोलिस प्रशासनासोबत चर्चा केली. त्यांनी हल्लेखोर वाघिणीचा तात्काळ बंदोबस्त करण्याचे निर्देश दिले. मृतकांच्या कुटुंबीयांपैकी एका व्यक्तीस वनविभागाच्या सेवेत सामावून घेण्याची आणि तात्काळ आर्थिक मदत पोहोचवण्याची मागणीही त्यांनी केली.

**मूल । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यात वाघाच्या हल्ल्यांनी पुन्हा एकदा थरकाप उडवला आहे. सलग तिसऱ्या दिवशी झालेल्या हल्ल्यात मूल तालुक्यातील भादुर्णी येथे तेंदूपत्ता तोडण्यासाठी गेलेल्या भूमिका दीपक भेंडारे (वय ३०) या महिलेचा जागीच मृत्यू झाला. तीन दिवसांत वाघाने पाच महिलांचा बळी घेतल्याने संपूर्ण जिल्ह्यात भीतीचं आणि संतापाचं वातावरण आहे. प्राप्त माहितीनुसार, भूमिका भेंडारे या आपल्या आईच्या घरी वास्तव्याला होत्या. सकाळी आठच्या सुमारास तेंदूपत्ता तोडण्यासाठी त्या गावालगतच्या जंगलात गेल्या असता झुडपात दबा धरून बसलेल्या वाघाने त्यांच्यावर हल्ला चढवला. हा हल्ला इतका भीषण होता की त्यात भूमिकेचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती गावात वाऱ्यासारखी पसरली आणि संतप्त ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यावेळी भूमिका भेंडारे यांचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात आढळून आ ा. ही घटना घडल्यानंतर ग्रामस्थांचा रोष उफाळून आला. काहींनी रागाच्या भरात जंगलाला आग लावण्याचा प्रयत्न केला. मात्र वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी वेळीच हस्तक्षेप करत मोठा अनर्थ टळवला. घटनास्थळी उपवनसंरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी, पोलीस निरीक्षक आणि गावकरी उपस्थित होते. दरम्यान, शनिवारी सिंदेवाही तालुक्यातील चारगाव परिसरात कांता चौधरी (६५), शुभांगी चौधरी (२८) आणि रेखा शेंडे (५०) या तिघींचा, तर रविवारी मूल तालुक्यातील महादवाडी येथे विमला शिंडे (६८) यांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला होता. त्यामुळे तीन दिवसांत पाच महिलांचा बळी गेला आहे.



### जंगलात जाणं जीवावर उठलं

वाघाच्या सततच्या हल्ल्यांमुळे तेंदूपत्ता वेचण्यासाठी जंगलात जाणाऱ्यांमध्ये भीतीचं वातावरण आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी जंगलात जावं लागतं, पण आता परत येणार की नाही, याची खात्री राहिलेली नाही, अशी प्रतिक्रिया गावकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

ग्रामस्थांचा वनविभागावर संताप व्यक्त होत असून, संरक्षणाची योग्य व्यवस्था नसल्यानं हल्ले वाढल्याचा आरोप करण्यात येत आहे. हल्लेखोर वाघाचा तात्काळ बंदोबस्त करून नागरिकांना संरक्षण द्यावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .